# बीड जिल्ह्यातील शिक्षक भरतीचा कोट्यावधी रुपयांचा घोटाळा राज्यात गाजला? बीडच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी केला नंगानाच ?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


**बोगस सह्या वापरून गैरव्यवस्था करण्याचा अनोखा प्रकार!**





■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २४५ ■ शनिवार दि.२४ मे २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 245 ■ Saturday Dt.24 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# अबब.. बीड जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रामध्ये मोठा भ्रष्टाचार अनेक शिक्षकांना नोकरी गमवावी लागणार, अनेक शिक्षकांच्या पायावर कुऱ्हाड?

## शिक्षण संस्था चालकांकडून नोकरीचे आमिष दाखवून कोट्यावधी रुपयांचा केला घोटाळा?

## अनेक पत्रकार आणि संपादकांनी स्वत:च्या नातेवाईकांना नोकरी लावण्यासाठी शिक्षण विभागावर दबाव आणत अनेक शिक्षण संस्थेत नौकरी मिळवल्या?

■ बीड जिल्ह्यातील खाजगी शिक्षक संस्थांना संच मान्यता दुरुस्ती करून आणण्यात मोठा हात?

■ शासनाच्या पैशाचा अपहार करणाऱ्या संबंधित संस्थाचालक व शासनाची फसवणूक करणारे कोण ते महारथी?

■ राज्य सरकारने या घोटाळ्यांची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष चौकशी पथक आणि न्यायाधीशांकडून चौकशी करण्याची मागणी?

■ या घोटाळ्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आणि सरकारी व्यवस्थेवर नकारात्मक परिणाम?

बीड I प्रतिनिधी

बीडच्या शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याचा उघडकीस आला आहे. शिक्षक भरतीमध्ये बीड जिल्ह्यात ५०० कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप आहे. आणि यासंदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांची चौकशी सुरू आहे. नागपूरमध्येही बोगस शिक्षक भरती आणि शालार्थ आयडी घोटाळ्याची प्रकरणे उघडकीस आली आहेत. बीडच्या शिक्षण विभागातील घोटाळा प्रकरणी भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या अध्यक्षांनी शिक्षक भरतीत मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाल्याचा आरोप केला आहे आणि यासंदर्भात







प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांची चौकशी सुरू आहे. आणि यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी होत आहे. बीड जिल्ह्यात शिक्षक भरती घोटाळ्याची प्रकरणे समोर येत आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत आहे. बीडच्या शिक्षण विभागात शिक्षक भरती घोटाळा मोठ्या प्रमाणावर पसरलेला आहे. आणि यासंदर्भात चौकशी आणि कारवाईची गरज आहे. या घोटाळ्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आणि सरकारी व्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होत. बीड जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागातील प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी व माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे हे रूजू झाल्यापासून शिक्षण विभागामध्ये कोट्यावधी रुपयांचा गैरप्रकार सुरू आहे. तसेच खाजगी शिक्षण संस्था चालविण्यात येणाऱ्या शाळांमध्ये शासनाचे सर्व नियम डावलून संस्था चालकांकडून आर्थिक देवाण-घेवाण करून शिक्षक भरती करून ५०० कोटींचा महाघोटाळा केलेला आहे. यासंदर्भात पहिल्यापासून सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ शासनदरबारी आवाज उठवत

▶ पान २ वर

**कमावलेले बेकायदेशीर संपत्ती जप्त करू शासन दरबारी जमा करावी?**

प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी व माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे वेतन अधीक्षक प्राथमिक विभागाचे ढाकणे व वेतन अधीक्षक माध्यमिक विभागाचे खटावकर व शिक्षण विभागातील कार्यालयीन अधीक्षक राऊत व लिपिक भेंडेकर तसेच शिक्षणाधिकारी माध्यमिक मधील उपशिक्षणाधिकारी मोहन काकडे व लिपिक ई टी शिंदे या सर्वांची एसआयटी मार्फत चौकशी करून यांनी केलेल्या बेकायदेशीर कामासंदर्भात तपास करून संबंधित आर्थिक गुन्हे शाखेकडे यांनी केलेल्या आर्थिक घोटाळ्यासंदर्भात तपास द्यावा व यांनी कमावलेले बेकायदेशीर संपत्ती जप्त करू शासन दरबारी जमा करावी अशी मागणी इंजिनियर साधी इनामदार भ्रष्टाचार निर्मूलन समिती यांनी केली आहे.

बीड जिल्हा खाजगी शिक्षण संस्थांमध्ये बोगस शिक्षक भरती व थकीत वेतन घोटाळ्यांमध्ये ज्या शिक्षकांचे भरती करण्यात आली, त्या सर्वांचे पगार खाते स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये खोलून त्यांच्या खात्यांवर थकीत वेतन व पगार अशी जिल्ह्यातील बोगस भरती प्रकरणातील शिक्षक यांच्या बँक खात्यांवर करोडो रक्कम वर्ग करण्यात आली. आलेले करोडो रुपये नगदी स्वरूपात बँकेतून काढण्यासाठी व बँकेच्या नियमानुसार जास्ती कॅश काढता येत नाहीव देता येत नाही. यामुळे त्यानंतर त्या शिक्षकांनी शकल लढवून ती रक्कम आरटीजीएस द्वारे खाजगी बँका व पतसंस्था मध्ये वर्ग केली व ते पैसे कॅश मध्ये उचलून ज्या खाजगी शिक्षक संस्था चालक यांना नियुक्त च्या बदल्यात रक्कम आलेल्या व काही पैसे बेकायदेशीर नियुक्त देण्यामध्ये सहकार्य केल्याबद्दल व मागणीच्या तारखे मध्ये बनावट स्वाक्षऱ्या करून कायम नियुक्ती दिल्याबद्दल शिक्षणाधिकारी प्राथमिक भगवान फुलारी व शिक्षणाधिकारी माध्यमिक नागनाथ शिंदे यांना दिले. काही रक्कम दिली व काही दलालांना दिले अशा प्रकारे हा शिक्षक भरती घोटाळा झाला आहे.

# बीड जिल्ह्यात एकनाथ शिंदे च्या शिवसेनेला स्वप्निल भैय्या गलधरमूळे ताकद मिळाली

## अनिल जगताप स्वप्नील गलधर सचिन मुळूक या त्रिमूर्तीने बीड जिल्ह्यामध्ये शिवसेनेचा आवाज वाढवला; बीडवासियांच्या देशभक्तीने ओथंबलेली भव्य तिरंगा रॅली संपन्न



बीड I प्रतिनिधी

सीमेपलीकडून वारंवार होणाऱ्या भ्याड हल्ल्यांना भारतीय सैन्याने दिलेले रोकठोक प्रत्युत्तर हे केवळ युद्धाचे नव्हे तर भारतमातेच्या वीर पुत्रांची शौर्यगाथा लिहिणारे आहे. या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी आणि मातृभूमीसाठी बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी आज बीड शहरात महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाट यांच्या प्रमुख उपस्थितीत बीडवासियांच्या देशभक्तिने ओथंबलेली भव्य तिरंगा रॅली संपन्न झाली.

विश्ववंदनीय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तिरंगा रॅलीस प्रारंभ झाला. यानंतर सुभाष रोड मार्गे जात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ अभिवादन करण्यात करण्यात आले आणि नंतर सीमारेषेवर मातृभूमीसाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. देशाच्या मातीसाठी, आपल्या लेकरांसाठी, आपल्या भविष्यासाठी आपल्या प्राणांची तमा न बाळगता लढणाऱ्या भारतीय सैन्याला अभिवादन करण्याकरिता भर पावसात बीडमधून प्रतिष्ठित नागरिक तथा असंख्य तरुण राष्ट्रीय ध्वज हाती घेऊन मोटारसायकलवर स्वार झाले. या रॅलीतून बीडकरांच्या निस्सीम देशभक्ति आणि देशप्रेमाचे दर्शन घडून आले.

याप्रसंगी शिवसेना विभागीय सचिव अशोकपटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बाप्पूसाहेब मोरे, माझे सहकारी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, युवासेनेचे बाजीराव चव्हाण, विपुल पिंगळे, अविनाश जाधव, सागर बहिर, अलकाताई डावकर, चंद्रकलाताई बांगर, रविराज बडे, सुजित शिंदे, गणेश शिराळे, मनोज चव्हाण यांच्यासह शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, एसटी कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# दुर्दैवी घटना वगळल्या तर बीड जिल्हा चांगल्या गोष्टीनेच प्रसिद्ध आहे : माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा कलाकारांची भूमी असून या जिल्ह्यात अनेक नामवंत व्यक्तींनी आपल्या कार्यातून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवलेला आहे काही दुर्दैवी घटना वगळल्या तर बीड जिल्हा चांगल्या गोष्टीने देखील प्रसिद्ध आहे. कचरवाडी सारख्या डोंगर कुशीत जन्मलेल्या एका तरुणाने चित्रपट क्षेत्रात भरभरून यश मिळवले असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

बीड जिल्ह्यातील कचरवाडी येथील रहिवासी असलेल्या डॉ.महेशकुमार वनवे यांच्या वामा लढाई सन्मानाची या चित्रपटाचे उद्घाटन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते तनिष्का चित्रपटगृहात करण्यात आले. यावेळी आ.विजयराजे पंडित, माजी आ.बदामराव पंडित, अॅड.उषाताई दराडे, सुभाष सारडा, अनिल जगताप, विनोद मुळूक, ज्योतीताई मेटे, अरुण डाके, विलास बडगे, सुधाकर मिसाळ, नितीन धांडे, संगीता धसे, नवनाथ शिराळे, अभय कोटेचा, गौतम खटोड, शुभम धूत, सुहास पाटील आदींची उपस्थिती होती. यावेळी ज्ञानेश्वर वनवे आणि लोकाशा च्या वतीने माजी मंत्री



जयदत्त क्षीरसागर यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोकाशाचे संपादक विजय बंब यांनी केले तर डॉ.महेशकुमार वनवे यांनी मनोगत व्यक्त करताना आतापर्यंत भोजपुरी सिनेमात काम केले पण मराठी चित्रपट म्हणून आज प्रथमच पदार्पण करत आहे. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे खूप मोठे सहकार्य मला लाभले असून मी मुंबईत गेलो तेव्हा तिथे अण्णांनीच मला आधार दिला माझ्या या यशाच्या मागे माझ्या घरातून पाठबळ असून यापुढे मराठी चित्रपट निर्मितीवर आपला भर असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, शुक्रवारी वामा लढाई सन्मानाची हा चित्रपट रिलीज झाला आहे राज्यात एकाच वेळी शेकडो थिएटर मधून हा चित्रपट रिलीज होतोय ही लोकांच्या शुभेच्छांची मोहर आहे. महेश वनवे यांनी जेव्हा मुंबईत प्रवेश केला तेव्हाच मी म्हणालो होतो काळजी करू नकोस, कचरवाडीच्या डोंगर रांगेच्या कुशीत जन्मलेल्या महेश याने कॅलिफोर्निया पर्यंत मजल मारली आहे. भोजपुरी लोकांचा पसंतीचा हिरो म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते दुर्दैवाने माणुसकीला काळीमा लागेल अशा घटना घडत आहेत पण बीड जिल्हा चांगल्या गोष्टीने कितीतरी पटीने पुढे आहे. विजय बंब सारखे पडद्यामागचे कलाकार पाठीशी आहेत बीड जिल्हा विविधतेने नटलेला जिल्हा आहे, स्त्री–पुरुष हा भेद आता राहिला नाही वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा याप्रमाणे पंढरीच्या विठ्ठलाने देखील स्वत: आपल्या बाजूला रखुमाईला उभे केले आहे. म्हणजेच भक्ती आणि शक्ती सोबत घेऊनच त्यांनी भक्तांचा सागर आपल्याकडे वळवला आहे. स्त्री शक्तीचा अनुभव म्हणून सुनीता विल्यम सारखी भारतीय वंशाची अंतराळवीर नऊ दिवसासांठी अंतराळ स्थानकावर गेली होती परंतु नऊ महिने संघर्ष करून तिने पृथ्वीवर प्रवेश केला यावरूनच स्त्रीशक्तीचा अंदाज आपण लक्षात घ्यायला हवा. या चित्रपटाचे कथानक स्त्री शक्तीवर अवलंबून असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आव्हान त्यांनी केले. यावेळी चित्रपट रिलीज झाल्यानंतर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी देखील अर्धा तास चित्रपटाचे परीक्षण केले.

# नेकनूरसह परिसरात अवकाळी पावसामुळे कांदा पिकांचे नुकसान

## पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी

नेकनूर । प्रतिनिधी

गेल्या पाच–सहा दिवसांपासून नेकनूर सह परिसरात अवकाळी पाऊस पडत आहे.त्यातच मागील काही दिवसांपासून सकाळी धुके, दिवसभर कडक ऊन आणि सायंकाळी मोठ्या प्रमाणावर उकाडा जाणवत आहे. यामुळे नेकनूर सह परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून नुकसान भरपाईची मागणी शेतकऱ्यातून केली जात आहे.

नेकनूर येथील शेतकरी प्रल्हाद चांगदेव शिंदे, चंद्रकांत आत्माराम शिंदे व नेकनूर सह परिसरातील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात कांदा लागवड केला होता. कांदा काढणीस आला असता या अवकाळी पावसाने कांदा शेतातच सडू लागला आहे. यामुळे शेतकर्यांचे लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे. तसेच पपई, टरबुज, डाळिंब आदी फळबागांचे ही प्रचंड नुकसान झाले असल्यामुळे शासनाने याचे तात्काळ पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकरी प्रल्हाद शिंदे यांनी केली.तसेच अवकाळीने कांद्याचे पीक पूर्णपणे काळवंडले आहे. फळबागांचे ही नुकसान झाले असल्यामुळे परिणामी, शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असून त्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. नुकसानग्रस्त भागात तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी,अशी मागणी नेकनूरचे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केली.





बीड:–गेवराई तालुक्यातील कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रा.राजेंद्र सोनवणे यांना राज्यस्तरीय हिंदी आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर समवेत प्रा.पंजाब येडे, श्रीकांत कुलकर्णी, संतोष येवारे आदि.

# ना. पंकजाताई मुंडेंचा एक फोन अन् भुसावळला बदली झालेले कर्मचारी परत परळीला रूजू

## थर्मलमधील 'त्या' कर्मचाऱ्यांनी मानले ना. पंकजाताईंचे आभार!

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या एका फोनमुळे काही दिवसापूर्वी परळी औष्णिक वीज केंद्रातून भुसावळ येथे बदली झालेल्या तंत्रज्ञ पदावरील कर्मचारी पुन्हा परळी येथे रूजू झाले आहेत. बदली रद्द झाल्याने आनंदित झालेल्या या कर्मचाऱ्यांनी ना. पंकजाताईंची मुंबईत प्रत्यक्ष भेट घेऊन आभार मानले आहेत.

परळी औष्णिक विद्युत केंद्रातील तंत्रज्ञ २ व तंत्रज्ञ ३ या पदावर कार्यरत असणाऱ्या काही कर्मचाऱ्यांच्या काही दिवसापूर्वी भुसावळ येथे बदल्या झाल्या होत्या. कुटुंबापासून दूर ठिकाणी बदल्या झाल्याने कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय वेगवेगळ्या कौटुंबिक अडचणीमुळे परेशान झाले होते. बदली रद्द व्हावी यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले पण यश न आल्याने अखेर त्यांना भुसावळ येथे जॉईन व्हावे लागले होते. हया सर्व कर्मचाऱ्यांनी मध्यंतरी ना. पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन आम्हाला पुन्हा परळीत आणावे अशी विनंती केली होती. ना. पंकजाताईंनी प्रत्येकाच्या कौटुंबिक अडचणीची दखल घेऊन वीज निर्मिती कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना एक फोन केला आणि सर्वांच्या पुन्हा भुसावळ येथून परळी औष्णिक वीज केंद्रात बदल्या झाल्या.

कर्मचाऱ्यांनी मानले आभार

भुसावळ येथून परत परळीला बदली झाल्याने तंत्रज्ञ २ चे कर्मचारी अविनाश पवार, संतोष ठोकळ, संतोष मुंडे तसेच तंत्रज्ञ ३ चे परमेश्वर बीडगर, गोविंद शेप, संपत बळवंत, गजानन गिते, मंचक फड, शिवाजी बीडगर, गोरखनाथ खाटिक, नागनाथ मुंडे, कृष्णा मुंडे, मदन फड, अरूण फड यांना ना. पंकजाताईंचे आभार मानले आहेत.

# झालं बरबाद हे जीवन नारीच केलं वाटोळ हुंड्यान पोरीच

हुंडा आणि मुलींचा बळी हे समीकरण इथल्या समाज व्यवस्थेच्या अंगवळणी पडलेला आहे त्यांना मुलींचे बळी जाणं मरणं हे जास्त चिंता जनक वाटत नाही? काहीच दिवसापर्यंत तिच्या दु:खा बद्दल हळहळ व्यक्त केली जाते पण तिच्या आई–वडिलांना झालेल्या वेदना तिच्या त्या गोंडस– निरागस मुलांला पोरके पण देणारी वेदना दिसेल काय ? खरंतर हुंडा... हुंडा ही एक अनिष्ट रूढ समाज मनावर घाला घालणारी निच प्रथा आहे अशा समाज विघातक प्रथेला वाव देत खरंतर मोठ मोठ्या सुशिक्षित, श्रीमंत घराणी प्रतिष्ठेसाठी या प्रथेला वाव देताना दिसतात

आज जेव्हा सावित्रीची लेक शिकते मोठी होते आणि या हुंड्याच्या विरोधात उभा राहून बोलते तेव्हा तिचा देखील विरोध केला जातो परंतु ही हुंडा प्रथा स्त्रीचा जिव घेत असेल तर आपण ती मोडण्याचा प्रयत्न केला पाहिजे कायद्याने जरी मोडीत काढली असली तरी हरामी मानसिकतेचे नराधम तीला दुजोरा देताना दिसतात आणि त्यामध्ये वैष्णवी सारख्या हजारो वैष्णवींचा जीव हकनाक गमावावा लागतो तर अशा हरामखोर पुरषी मानसिकतेच्या जाचक रूढी विरूद्ध ठोस कारवाई हुंडा घेणाऱ्या आणि देणाऱ्या वरती झाली पाहिजे खरंतर मला इथे सांगावसं वाटतं की मुलींना हुंडा देताना आई–बाबांनी विचार करायला हवा तुम्ही तुमच्या मुलीला हुंडा देता हुंडयामध्ये गाड्या– घोड्या, पैसा अडका, सोन –नानं देता मग या पेक्षा मला तर असं वाटतं की तुम्ही त्या पैशांमध्ये तुमच्या मुलीला एखादा व्यवसाय टाकून द्यावा आणि त्या व्यवसायामध्ये तिचे भविष्य बघावं खरं तर तुम्ही तुमच्या कष्टाची दौलत मुलीसाठी खर्च करता म्हणजे हुंडा देऊन तुम्ही सांगता की माझी मुलगी खूप चांगल्या घरात गेली माझ्या मुलीचं खूप चांगलं झालं आहे ती सुखी आहे पण गावकडे ऐक म्हण आहे

लेक मोठ्या घरी दिली अन् भेटायची अडचण झाली..

अशी अवस्था होत असते तुम्ही त्या घरी हक्काने जाऊ शकत नाही जास्त दिवस राहू शकत नाही असला मोठेपण काय कामाचा त्यापेक्षा तुम्ही तो पैसा तिच्या भविष्यासाठी तिच्या शिक्षणासाठी खर्च केला पाहिजे आणि तिला स्वत:च्या पायावर उभे करा जेणे करून ती अशा गोष्टींना तोंड देण्यापेक्षा किंवा गुदमरून आत्महत्या करण्यापेक्षा ती स्वत:च्या पायावर वेगळ्या पद्धतीने उभी राहील आणि स्वत:चं जीवन सुखाने आनंदाने जगेल. तुम्हाला बघायला तरी मिळेल पण आज अशा वैष्णवी सारख्या हजारो घटना पाठी मागे झालेल्या आहेत आणि पुढे ही होत राहतील आपण सांगू शकत नाही खर तर सत्तेचा माज असल्यामुळे आणि राजकीय दबावामुळे या घटना घडल्या जातात तर कुठेतरी याला आळा बसला पाहिजे कुठेतरी या थांबल्या पाहिजेत आणि त्यासाठी खरं तर मी एक स्त्री म्हणून



सांगते मुलींनो तुम्ही भक्कम व्हा! तुम्ही आत्मनिर्भर बना तुम्ही अबला नसून सबला आहात हे नेहमी स्वत:ला सांगत चला तुम्ही सबला झाल्या शिवाय हा समाज तुम्हाला घाबरणार नाही जोपर्यंत तुम्ही पुरुषप्रधान या दडपशाही मध्ये राहणार आहात तोपर्यंत तुम्हाला या देशात राष्ट्रात पुरुषप्रधान या नावाखाली नेहमी गाडल जाईल जोपर्यंत तुम्ही त्याचा कडाडून असा विरोध करत नाही या पुरुष प्रधान संस्कृतीचा तोपर्यंत तुम्हाला दाबलं जाईल पिळलं जाईल त्यासाठी तुम्ही शिका आणि या अशा भयंकर प्रथेला लाथ मारा अस मी प्रत्येक स्त्री वर्गाला सांगेल प्रत्येक मुलीला सांगेल आणि तुम्ही सक्षम व्हा पण तुम्ही वैष्णवीसारख्या हुंड्याला बळी जाऊ नका आणि स्वत:चा हा अनमोल जीव गमावू नका, उध्वस्त करु नका..

जेव्हा तुम्हाला वाटत आहे की माझ्यावर खूप अन्याय होत आहे सहन होत नाहीये. आई–वडिलांचे इज्जतीसाठी स्वत:चा संसार मोडेल यासाठी तुम्ही जर तो अन्याय सहन करत असाल आणि तो अन्याय करणाऱ्याला जर त्याची जाणीव नसेल तर तो अन्याय कधीच समोर येणार नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की अन्याय करणाऱ्या पेक्षा अन्याय सहन करणारा मोठा गुन्हेगार असतो आणि तसा गुन्हेगार तुम्ही बनू नका तर त्याचा सडेतोड विरोध करा त्याच्या पलीकडे जाऊन जर तुमचा त्या संसारिक सुखामध्ये तुम्हाला जर सुख मिळत नसेल तर तुम्ही त्याच्यापासून अलिप्त व्हा आणि स्वत:च एक वेगळं जीवन सुरू करा परंतु तुम्ही जगल्या पाहिजेत तुम्ही वाचल्या पाहिजेत कारण की अशा पुरुषांना त्यांच्या पैशाच्या माजावर अनेक बायका मिळतील,,परंतु तुमच्या मुलाला आई मिळणार नाही आणि तुमच्या आई–वडिलांना मुलगी मिळणार नाही या विचाराने तुम्ही जगा तुम्ही असा आत्महत्येचा निर्णय कधीच घेऊ नका त्याच्याने फक्त तुमचा जीव गमावू शकतो तुमचा जीव जाऊ शकतो आणि याचा दु:ख आजीवन तुमच्या आई–वडिलांना राहणार आहे त्यामुळे सर्व मैत्रिणींना सर्व महिला भगिनींना हात जोडून विनंती आहे की अशा गोष्टींना भिडा लढा परंतु स्वत:चा जीव कधीच गमावू नका.

हुंडा घेऊ नका हुंडा देऊ नका
ऐका कवीच्या ओळी आहेत की
झालं बरबाद हे जीवन नारीच
केलं वाटोळ हुंड्यान पोरीच

लेखिका/कवयित्री :अमू डिपी
आम्रपाली सुशीला ज्ञानोबा पारवे बीड

पान १ वरून...

## अबब.. बीड जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रामध्ये मोठा भ्रष्टाचार अनेक शिक्षकांना...

आहे. याकडे प्रशासनाने लक्ष घालून संबंधितांवर कारवाई करण्याची गरज आहे.

प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी व माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी दि.१३ मे रोजी शिक्षण आयुक्त पुणे यांना दिलेल्या लेखी खुलासांमध्ये म्हटलेले आहे की, आम्ही थकीत वेतन काढले व कायम नियुक्त दिल्या व विनाअनुदानित करून अनुदानित वरती पद भरले ज्या शाळेमध्ये निवृत्त झालेल्या शिक्षकांच्या रिक्त पदावरती नियुक्त्या दिल्या व न्यायालयाचे आदेशानुसार नियुक्त्या दिल्या हे सर्व नियमानुसार केले असे लेखी खुलासांमध्ये म्हटलेले आहे. परंतु दि.२२ मे रोजी शिक्षण आयुक्त यांनी शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांना माहितीस्वव व कारवाईस्तव बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना शिक्षणाधिकारी भगवान फुलारी व नागनाथ शिंदे यांनी त्यांच्या खुलासा मध्ये कोणत्या शाळेतील कोणत्या शिक्षकाची नियुक्ती केली व न्यायालयाची आदेशानुसार कोणत्या शिक्षकाला नियुक्ती दिली. विनाअनुदानित करून अनुदानित वर कोणत्या शाळेतील शिक्षकांच्या नियुक्ती केल्या. कोणत्या शासन निर्णयानुसार नियुक्ती केल्या याबाबत कोणतीही पुरावे खुलासासोबत जोडलेले नसल्याने व शाळांची व शिक्षकांची नावे नसल्यामुळे याबाबत सखोल चौकशी करण्याचे आदेश शिक्षण आयुक्त पुणे यांनी दिलेले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. राज्य सरकार, शिक्षण विभागाने सर्व संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्तांना द्यावे. या घोटाळ्यात मोठ्या प्रमाणात पैशाची देवाण–घेवाण करण्यात आली असून नियुक्तीपासून तर वेतन निश्चिती पथक, वेतन जमा करेपर्यंतचा सखोल तपास झाल्यास हा शेकडो कोट्यवधींचा मोठा घोटाळा पुढे येण्याची शक्यता आहे. तसेच शासनाच्या पैशाचा अपहार करणाऱ्या संबंधित संस्थाचालक व शासनाची फसवणूक करणारे शिक्षण अधिकारी व वेतन अधीक्षक प्राथमिक व माध्यमिक या सर्वांवर गुन्हे दाखल करून शासनाच्या पैशाची वसुली करण्यात यावी व या सर्व अधिकारी संस्थाचालक यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून संपत्ती प्रॉपर्टीची चौकशी करून बेकादेशी संपत्ती जप्त करावी अशी, मागणी होत आहे.

उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी शासनाच्या नियमानुसार व मेरिट पाहून व कायद्याच्या चौकटीमध्ये राहून संबंधित शिक्षकांचे प्रकरणांवर चार महिन्यांमध्ये आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा असे आदेश न्यायालयाने दिले होते परंतु शासनाचे मार्गदर्शन न घेता व पदाचा गैरवापर करून व वरिष्ठ अधिकारी यांची दिशाभूल करून न्यायालयाचा संदर्भ देऊन शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांनी कायमचा नियुकत्या दिल्या व बीड जिल्ह्यामधील अनेक खाजगी संस्थांमधील शिक्षकाकडून व संस्था चालकाकडून आर्थिक देवाण–घेवाण करून कायम नियुक्त दिल्या व मागील अनेक वर्षापासूनचे थकित वेतन काढले जे की, त्या–त्या वर्षाच्या मार्च एन्ड च्या अगोदर काढायचे असता. त्यांनी बेकायदेशी दिलेल्या, नियुक्ती व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी देवगुडे व पोकळे यांच्या बनावट सह्याचे २०१२ च्या पूर्वीचे कायम मान्यता आदेश बनवून त्यांनी २००६ सात पासून ते आज पर्यंत थकीत वेतनने काढली व शासनाच्या तिजोरील मध्ये संबंधित संस्थाचालक शिक्षक व अधिकाऱ्यांनी व दोन्ही शिक्षणाधिकाऱ्यांनी डल्ला मारला. शासनाच्या पैशाचा अपहार करणाऱ्या संबंधित संस्थाचालक व शासनाची फसवणूक करणारे शिक्षण अधिकारी व वेतन अधीक्षक प्राथमिक व माध्यमिक या सर्वांवर गुन्हे दाखल करून शासनाच्या पैशाची वसुली करण्यात यावी, व या सर्व अधिकारी संस्थाचालक यांच्या सर्व संपत्ती प्रॉपर्टीची चौकशी करून बेकायदेशी संपत्ती जप्त करण्याची गरज आहे.

चौकट–

केजचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांनी माजलगाव तालुका व केज तालुक्यातील काही खाजगी शिक्षण संस्थांमध्ये संस्थाचालक यांच्याकडून तुमच्या शाळेमध्ये किती नवीन शिक्षक भरायचे आहे. ते मी काम शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्याकडून करून देतो, असे म्हणून संबंधित शिक्षण संस्था चालकाकडून कोट्यावधी रुपयाची माया जमवली व शिक्षणाधिकारी यांना थोडेफार चिरीमिरी करून करोडो रुपयाचा भ्रष्टाचार करण्यामध्ये व शिक्षणाधिकारी प्राथमिक भगवान फुलारी यांचा आर्थिक व्यवहार शिक्षक भरती घोटाळ्यात देवाण–घेवाण व रोकड जमा करण्याचे काम लक्ष्मण बेडसकर यांनी केला आहे. यामुळे यांची देखील चौकशी होणे तितकेच गरजेचे आहे.

चौकट–

कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने साहेब तात्काळ सर्व फायली आपल्या कार्यालयाकडे जमा करण्याचे आदेश द्या?

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक तसेच वेतन अधीक्षक प्राथमिक व माध्यमिक यांच्याकडून शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये नियुक्ती दिलेल्या सर्व आदेशाची फाईल व वेतन अधीक्षक कार्यालयाकडील दाखल केलेले शालार्थ आयडी आदेश व थकीत वेतन बिले तात्काळ आपल्या ताब्यात घेण्यात यावे. काही फाईल तर कार्यालयामधून गायब झाल्या आहेत. व काही फाईल ज्या संस्था चालकांची बेकायदेशीर कामे करण्यात आली. अशा सर्व संस्थाचालकांनी व दलाल यांनी शिक्षण विभागातून व वेतन अधीक्षक कार्यालयातून खाजगी शिक्षक भरती घोटाळ्याच्या फाईल घेऊन गेल्याची दबक्या आवाजात चर्चा आहे तरी कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने साहेब तात्काळ सर्व फायली आपल्या कार्यालयाकडे जमा करण्याचे आदेश दोन्ही शिक्षणाधिकारी व दोन्ही पे युनिटचे वेतन अधीक्षक यांना आदेशित करा.

चौकट–

बोगस शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये ज्या शाळांमध्ये शिक्षण भरती करण्यात आली आहे. त्या शाळेतील संच मान्यता दुरुस्त करताना तत्कालीन शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांचे संच मान्यता दुरुस्त करण्याबाबत कोणतेही पत्र शिक्षण संचालक विभाग पुणे यांना देण्यात आलेले नसतानासुद्धा ऑनलाईन संच मान्यता दुरुस्त करण्यात आली. यामध्ये शिक्षण संचालक विभाग प्राथमिक व माध्यमिक पुणे यांनी सुद्धा शिक्षक भरती घोटाळ्यामध्ये हात काळे केल्याची शंका वर्तवली जात आहे. संच मान्यता घोटाळ्यामध्ये संच मान्यता बेकायदेशीर रित्या दुरुस्त करण्याचे प्रकरण हे वेतन अधीक्षक प्राथमिक ढाकणे व वेतन अधीक्षक माध्यमिक खटावकर यांच्या हाताने पुणे येथील संचालक शिक्षण विभाग येथील अधिकाऱ्यांच्या सोबत संघांमत करून बीड जिल्ह्यातील खाजगी शिक्षक संस्थांना संच मान्यता दुरुस्ती करून आणण्यात मध्ये मोठा हात आहे.

# मराठवाड्यात सस्ती अदालत ठरतेय परिणामकारक

## विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या संकल्पनेला मोठा प्रतिसाद – बीड जिल्ह्यात एकाच दिवशी ५९ रस्ते मोकळे

छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या संकल्पनेतून कमी खर्चात आणि कमी वेळात शेतकऱ्यांचे रस्ते मोकळे करून देण्याची सस्ती अदालत योजना परिणामकारक ठरत आहे. दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी सस्ती अदालत संकल्पना राबविण्याचा उपक्रम विभागीय आयुक्त यांनी सुरू केला.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत. नुकताच त्यांनी दोनशे रुपयात शेताच्या हद्दीची मोजणी करता येईल असा निर्णय घेतलेला आहे. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून गुरुवारी विभागातील आठही जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची दूरदृष्यप्रणालीद्वारे विभागीय आयुक्त यांनी बैठक घेतली. शुक्रवारी सकाळी दहा ते एक या कालावधीत छत्रपती संभाजीनगर विभागामधील सर्व तालुक्यात सस्ती अदालत योजना राबविण्याचे त्यांनी निर्देश दिले. त्यानुसार वेगवेगळ्या तालुक्यात कुठे तालुकास्तरावर सस्ती आदालत योजना राबविण्यात आली तर कुठे तहसीलदार थेट बांधावर गेले; कुठे नायब तहसीलदार गेले तर कुठे मंडळाधिकाऱ्यांनी रस्ते मोकळे करून दिले. अशाप्रकारे छत्रपती संभाजीनगर विभागातील महसूल विभागाने अनेक रस्ते मोकळे केले.

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी सुद्धा कालपासून सर्व तहसीलदार व अधिनस्त स्टाफला योजनेविषयी प्रोत्साहित केले. शेतकऱ्यांच्या हिताची असलेली ही योजना खूप सुटसुटीत आणि प्रभावी ठरत आहे. शुक्रवार ( दि १३) रोजी बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यात समुपदेशनाद्वारे पाच रस्ते, मामलदार कोर्ट अधिनियमानुसार २१





रस्ते तर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १४३ नुसार ३३ रस्ते असे एकूण ५९ रस्ते खुले करण्यात आले. बहुदा इतिहासातील ही पहिलीच वेळ असावी की एकाच दिवशी इतके रस्ते खुले झाले.

काय आहे सस्ती अदालत योजना : शेतकऱ्यांना रस्ता मोकळा करून घ्यायचा असेल किंवा नव्या रस्त्याची मागणी करायची असेल तर तहसील कार्यालयास अर्ज द्यावा लागतो. त्यानंतर तहसील कार्यालयातून मंडळ अधिकारी , तलाठी यांना स्थळपाहणीसाठी पाठवण्यात येते. त्यासाठी पत्र काढणे, पत्र तामील होणे, प्रत्यक्षात स्थळ पाहणी होणे यास बराच विलंब होतो. त्यानंतर प्रकरण सुनावणीसाठी तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांच्याकडे येते. ज्यास रस्ता हवा आहे त्या शेतकऱ्यास वकिलामार्फत अथवा स्वत: मार्फत बाजू मांडावी लागते. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तहसीलदार अथवा नायब तहसीलदार निर्णय देतात. यासाठी वकिलाचा खर्च, कागदपत्रांचा खर्च, येण्या–जाण्याचा खर्च इत्यादी बाबींवर मोठ्या प्रमाणात खर्च होतो. या सर्व बाबींना फाटा देत, अर्जदार, गैरअर्जदार यांच्याशी सल्लामसलत करून, त्यांचे समुपदेशन करून, रस्त्याची गरज पटवून देणे व सामोपचाराने शेत रस्ता, पानंद रस्ता, शिवरस्ता मोकळा करून देणे. यासाठी कमीत कमी खर्च येईल व कमीत कमी वेळ लागेल हा या योजनेमागचा मूळ उद्देश आहे.

मुळात मराठवाड्यातील शेतकरी गरीब आहे. नेमकी हीच बाब विभागीय आयुक्तांनी हेरली. शेतकऱ्यांना कमी खर्चात आणि कमी वेळेत रस्ते देण्याची ही अभिनव संकल्पना त्यांनी अमलात आणून यशस्वी करून दाखवली. अशाप्रकारे राज्यात सर्वत्र सस्ती अदालत सारखी योजना राबवली तर शेतकऱ्यांचे रस्त्याचे प्रश्न जागेवर आणि लवकरात लवकर निकाली निघण्यास निश्चितपणे मदत होईल.

बीड तालुक्यातही शुक्रवारी सात रस्त्याबाबत निर्णय घेण्यात आला. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, निवासी नायब तहसीलदार सुहास हजारे यांनी उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या समवेत तहसील कार्यालयात सात प्रकरणात निकाल दिला. असाच एक रस्ता तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी सौ शीतल चाटे, मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे, ग्राम महसूल अधिकारी / तलाठी लक्ष्मण ओव्हळ, अमोल अधापुरे, कोतवाल बाबासाहेब बिरलिंगे यांच्यामार्फत सावरगाव घाट येथे मोकळा करण्यात आला.

अर्जदार गणेश देशमुख यांच्या अर्जावरून गैर अर्जदार श्री खाकरे व इतर यांच्या समक्ष खडकी घाट – सावरगाव घाट शिवरस्ता जो की खडकी घाटच्या स्वाती मदन शिरसट व सावरगाव घाट मधील शेतकरी यांचे पोल्ट्री फार्म दरम्यान आहे तो शिवरस्ता अतिक्रमीत होता, तो मंडळ अधिकारी यांच्या समज देण्यावरून व शेतकऱ्यांशी चर्चामसलत करून सामंजस्याने मोकळा करण्याचे ठरवण्यात आले. अल्पभूधारक शेतकरी, पिचलेले शेतकरी यांच्या भल्यासाठी बीडचे महसूल प्रशासन राबत असल्याने सर्वसामान्य शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केलेले आहे. एकंदरीतच मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांची सस्ती अदालत योजना ज्यामुळे स्वस्तात व लवकरात रस्ते होऊ लागले ती अभिनव व खरोखरच कौतुकास्पद आहे.

# द्वारकादास मंत्री यांनच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करावे : नगरसेवक वाघमारे

## नगरपालिका परिसरात पुतळा असून देखील दुर्लक्ष

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील सर्वच महापुरुषाच्या पुतळा परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून पुतळ्या जवळील विद्युत खांबावरील लाईट बंद असल्याचे देखील दिसत याकडे नगरपालिका मुख्याधिकारी यांचे दुर्लक्ष असल्यानेच बीड शहरातील महापुरुषांच्या पुतळ्या परिसरातील सुशोभीकरण रखडले आहे.

बीड शहराचे प्रथम नगरअध्यक्ष व माजी खासदार कै.द्वारकादासजी मंत्री यांचा पुतळा नगरपालिका आवारात असून या पुतळ्याची दुरावस्था झाली आहे. याकडे नगरपालिका दुर्लक्ष करत असून पुतळा परिसर स्वच्छ करून सुशोभीकरण करण्यात यावे अशी मागणी ज्येष्ठ नगरसेवक विष्णू वाघमारे यांनी निवेदनातून केली आहे.

शहराचे प्रथम नगराध्यक्ष असलेले दिवंगत द्वारकादासजी मंत्री साहेब यांनी शहराच्या विकासाचा पाया रचलेला आहे.त्यांनी खासदार म्हणूनही उत्तम काम केलेले आहे. त्यांच्या कार्यकाळात बीड शहराच्या विकासाला गती मिळाली होती.

नगरपालिका आवारात असलेल्या या पुतळा परिसराची दुरवस्था झाली आहे.चबुतरा तुटला असून आसपास घाणही आहे, सुरक्षेसाठी लावलेल्या लोखंडी ग्रील तुटल्या असून, फरश्या देखील फुटल्या आहेत.त्याची दुरुस्ती करून सुशोभीकरण करावे,अशी मागणी ज्येष्ठ नगरसेवक विष्णू वाघमारे यांनी पालिका मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.



# विविध क्षेत्रातील दिग्गजांचा सत्कार सोहळा

## स्मृतीशेष ईश्वरजी कागदे सेवाभावी संस्था आणि सचिनभाऊ कागदे मित्र मंडळातर्फे भव्य आयोजन

परळी वै. । प्रतिनिधी

स्मृतीशेष ईश्वरजी कागदे सेवाभावी संस्था परळी वै. आणि सचिनभाऊ कागदे मित्र मंडळातर्फे आंबेडकरी समुहातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. रविवारी दि.२५ मे २०२५ रोजी सिद्धार्थ नगर बुद्ध विहार येथे सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम पार पडेल. या सोहळ्यात शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, साहित्यिक, कला, पत्रकारिता, धम्मकार्य, आंबेडकरी चळवळ, प्रशासकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या व्यक्तींचा गौरव करण्यात येणार आहे.

यामध्ये रामदादा किरवले, प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे, प्रो.डॉ. संजय जाधव, रानबा गायकवाड, उपजिल्हाधिकारी महादेवजी किरवले, उप शिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे, उत्तमजी कांबळे, डॉ. राजेश इंगोले, प्राचार्य महेंद्र शिंदे, डॉ. विक्रम धनवे, डॉ. सुजाता धनवे, प्रा. डॉ. माधव रोडे, प्रा. डॉ. विनोद जगतकर, डॉ. दयानंद मस्के, प्रा. दयानंद झिंजुर्डे, डॉ. धम्मपाल घुमरे, डॉ. सचिन भुंबे, डॉ. विजयानंद बनसोडे, अमोल कांबळे, दिलीप भालेराव, वैभव (भैय्यासाहेब) आदोडे, संविधान वाघमारे, चेतन चोपडे, सुधाकर सूर्यवंशी, धोंडीराम रोडे, रणजीत उपाडे, राहुल सूर्यवंशी, बबन मस्के, प्रल्हाद अवचारे, निवेदक बा.सो. कांबळे आदींचा समावेश आहे.




विविध क्षेत्रातील योगदान देणाऱ्या मान्यवरांचा 'स्मृतिशेष ईश्वरजी कागदे स्मृती विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे तसेच स्मृतीचिन्ह, शाल आणि सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

आंबेडकरी समाजाच्या अडीअडचणीच्या काळात आपला जीव धोक्यात घालून आंबेडकरी चळवळीला योगदान दिलेल्या व्यक्तींचाही या सोहळ्यात गौरव करण्यात येईल.

हा कार्यक्रम युवा नेते सचिन भाऊ कागदे यांच्या मित्र मंडळाच्या वतीने आणि कालवश ईश्वरजी कागदे सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला आहे. या सत्कार सोहळ्यासाठी समाजातील सर्व स्तरातील लोकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन दलित पँथर चळवळीतील सक्रिय लढाऊ भीमसैनिक पप्पू कागदे, सचिन कागदे, राहुल कागदे, सुनील कांबळे, विधिज्ञ दिलीप (मामा) उजगरे यांचेसह सर्व संयोजकांनी केले आहे.

# वीज पुरवठा वारंवार खंडित ग्रामीण भागातील नागरिक त्रस्त

परतूर । प्रतिनिधी

परतुर तालुक्यातील खांडवी सबटेशन हादीतील सिरसगाव येथील उन्हाळ्याचे दिवस व उष्णतेचे वातावरण त्यातच रात्रंदिवस सुरू असलेल्या विजेच्या लपंडवामुळे ग्रामीण भागातील नागरिक वैतागले आहे. विज वितरण कंपनीने याकडे लक्ष केंद्रीत करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

सध्या अवकाळी पाऊस कमी व उन जास्त तापत आहे. आधीच अती उष्णता आणि उकाड्यामुळे जीवाची लाही लाही होत असताना दुपारी, संध्याकाळी व रात्रीच्या सुमारास विज गुल होण्याच्या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या सततच्या विद्युत खंडीत पुरवठ्यामुळे सर्वांना रात्रीला झोप न घेता मच्छराचा सामना करावा लागत आहे.

मागील एका आठवडा भरापासून विज गुल होण्याच्या प्रकारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने वारंवार विज गुल होत असल्याने अंधारातच लग्न सोहळ्याची कामे उरकावी लागत आहे. विज वितरण कंपनीच्या कर्मचारी व शाखा अभियंता यांना लाईन विषयी विचारणा केली असता ते फोन घेत नाहीत. त्यामुळे खंडीत झालेला विज पुरवठा केंव्हा सुरू होणार हे समजू शकत नाही. त्यामुळे वरिष्ठांनी याकडे लक्ष केंद्रीत करून विज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी पिंप्रुळा, खांडवी, खांडवी वाडी, सिरसगाव परिसरातील त्रस्त विज ग्राहकामधून होत आहे.



आष्टी पंचायत समिती कार्यालयातील शौचालय असून अडचण नसून खोळंबा अशा प्रकारे दैनिय अवस्था झाली आहे. या शौचालयात पाणी नाही बिसिंग मध्ये गुटखा मावा खाऊन थुकलेला थर साचला आहे मात्र कार्यालय थुकल्यास पाचशे रुपये दंड असा बोर्ड फक्त नावालाच दिसत आहे मग बाहेरून आलेल्या लाभार्थ्यांनी या कार्यालयात शौचालय जायचे कुठे असा प्रश्न सध्या उपस्थित होत आहे मग हे फक्त शौचालय नावालाच बांधले आहेत का अशी चर्चा आलेल्या लाभार्थ्यात चालू असताना दिसत आहे. (छायाचित्र सुरेश कांबळे आष्टी)

# सैनिकी स्कूल प्रवेश परीक्षेत ज्ञानदीप विद्यालयाचे तब्बल सात विद्यार्थी पात्र

धारूर । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना बालवयापासून इंटरनॅशनल लेवलच्या स्पर्धा परीक्षांची ओळख व्हावी व स्पर्धा परीक्षेविषयी भीती दूर व्हावी यामुळेच आशा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा व यश मिळावे यासाठी बाल वयापासून ज्ञानदीप विद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षा वर विशेष भर दिला जाणार आहे असे शाळेतील स्पर्धा परीक्षा विभागप्रमुख अशोक अंडील सर यांनी सांगीतले.

धारूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात व शालेय स्पर्धा परीक्षांमध्ये अग्रेसर असणाऱ्या ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय किल्ले धारूर येथील तब्बल सात विद्यार्थी ऑल इंडिया सैनिकी स्कूल प्रवेश परीक्षेत पात्र झाले आहेत यामध्ये अंतरा आनंद फपाळ, समीक्षा



बालासाहेब चाटे, साईनाथ अमोल गुळवे, अदिती गणेश काळे, अक्षया महादेव कणसे, प्रिया सुजयसिंह चौव्हान, प्राजक्ता गंगाधर शिंपले या विद्यार्थ्यांनी सैनिकी स्कूल प्रवेश परीक्षेमध्ये पात्र होत घवघवीत असे यश संपादन केलेले आहे. यावेळी त्यांचे मार्गदर्शक विभागप्रमुख व वर्गशिक्षक श्री अशोक अंडील सर यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे कौतुक करत याही पुढे विद्यार्थ्यांनी अशाच विविध इंटरनॅशनल लेवलच्या स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन यश संपादन करावे अशा शुभेच्छा दिल्या. तसेच यशाबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद व पालक वर्गातून या विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

# देशसेवार्थ लष्करात मानव बॉम्ब नियुक्त : राजन माकणीकर

मुंबई । प्रतिनिधी

देशाच्या सीमेवर पाकविरोधात मला मानव बॉम्ब म्हणून नियुक्त करण्यात यावे अशी इच्छा पत्राद्वारे मराठवाड्याचे सुपुत्र लातूर जिल्हा, अहमदपुर चे तालुक्यातील भूमिपुत्र, मुंबई उपनगरात वास्तव्यास असलेले पॅन्थर डॉ. राजन माकणीकर यांनी देशाचे संरक्षण मंत्री मा. राजनाथ सिंह यांच्याकडे मागणी केली आहे.



डॉ. माकणीकर यांनी लिहिलेल्या पत्रात पुढे म्हटले आहे की, मी कला शाखेतून पदवीधर असून, पत्रकारिता व सामान्य विज्ञान निसर्गपचार योगिक विज्ञान या शाखेतून विशेष प्रावीन्यात शिक्षण पूर्ण केले आहे. माझ्या वयाच्या १८ व्या वर्षांपासून मी देशसेवार्थ लष्करात सामील होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला आहे. मात्र मी लष्करात सामील होऊ शकलो नाही हे माझं दुर्भाग्य आहे.

यापूर्वी सुध्दा मी ८ वेळेस तत्कालीन संरक्षण मंत्री भारत सरकार व महाराष्ट्र राज्य सरकारांना पत्र लिहून तर इमेल पाठवून तसेच लष्कर सेवेत भरती होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. या भारत मातेचा मी सुपुत्र असून या नात्याशिवाय या दुनियेत मी कोणत्याच नात्याला सन्मान देत नाही किंवा कोणतेही नाते जतन करत नाही. मी एक लावारीश म्हणून असलो तरी भारत मातेचा सुपत्र आहे.

लष्कर सेवेत माझा मृत्यू झाला किंवा युद्धात शहीद झालो तर केवळ आणी केवळ भारत मातेचा सुपत्र म्हणून माझ्यावर अंत्य संस्कार करावेत. कोणी नामधारी मित्र, सहकारी किंवा आई, बहिणी, बायको, मुलगी किंवा मुलगा असे व अन्य बनावट नाते सांगून माझा मृतदेह मागत असतील तर तो कुणालाही देवू नये. लष्कराच्या वतीने विशेष भरती प्रक्रिया राबवून मानव बॉम्ब म्हणून माझी नियुक्ती पाकिस्तान अथवा चीन विरोधी कारवायांसाठी केली तर मी ते भाग्य समजून कर्तव्य जवाबदारीने पार पाडीन. अशि तीव्र इच्छा, मनोदय व आशावाद माकणीकर यांनी केंद्र सरकार कडे व्यक्त केला आहे.

# माळेगावात धारदार शास्त्राचा धाक दाखवून साडेचार लाखाचा ऐवज लंपास

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील माळेगाव येथील नवीन प्लॉट वरील वसाहतीत राहणाऱ्या आण्णा कोंडीबा चाळक यांच्या घराचे दार गुरुवारी पहाटे तीन वाजण्याच्या दरम्यान तोडून तोंडाला कपडा बांधलेल्या चौघांनी घरात प्रवेश करुन पती, पत्नीला चाकू सारख्या धारदार शस्त्राचा धाक दाखवून नगदी रोख ७४ हजार रुपयांसह एकूण ४ लाख ४४ हजार रुपयांचे दागिने व ऐवज चोरून नेल्या प्रकरणी युसूफ वडगाव पोलिसात चार ते पाच अनोळखी चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे. केज तालुक्यातील माळेगाव येथील प्लॉट वरील नवीन वसाहतीत राहणारे आण्णा कोंडीराम चाळक हे शेतकरी असून आपल्या घरात कुटुंबियांसह झोपले असता गुरुवारी पहाटे तीन वाजण्याच्या दरम्यान घराचे दार तोडून २५ ते ३० वयोगटातील चार अनोळखी तरुण तोंडाला रुमाल बांधून घरामध्ये घुसले.

चाकु सारख्या धारदार शस्त्राने आण्णा चाळक व त्यांच्या पत्नीला धाक दाखवून कपाटात ठेवलेले एक तोळ्याचे झुंबर जोड, सात ग्रॅमचा नेकलेस, सात ग्रॅमचे मिनी गंठण, पाच ग्रॅमची सोन्याची ठुशी, चार ग्रॅमचे मनी, मंगळसूत्र, पाच ग्रॅमची अंगठी अशा दागिन्यासह, नगदी रोख ७४ हजार रुपये मिळून एकूण ४ लाख ४४ हजार रुपयाचा ऐवज चोरट्यानी लंपास केला. या प्रकरणी अण्णा कोंडीराम चाळक यांच्या फिर्यादी वरून युसूफ वडगाव पोलिसात गुरुवारी रात्री तोंडाला रुमाल बांधलेल्या चार अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखलकरण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे हे करीत आहेत.

### ठसे तज्ञ पथक पाचरण

या प्रकरणी पावसाळी वातावरण असल्यामुळे श्वान पथकाऐवजी ठसे तज्ञाचे पथक पाचरण करण्यात आले होते. त्या दिशेनेही तपास चालु असल्याची माहिती सहाय्यक पोलीसनिरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

### इतर तीन ठिकाणीही चोरीचा प्रयत्न

माळेगाव येथील कपड्याच्या दुकानासह इतर दोन ठिकाणीही चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केला होता. परंतु त्या ठिकाणचे नागरिक जागे झाल्यामुळे तेथील चोरीचा त्यांचा प्रयत्न फसल्याची माहिती गावकऱ्यांनी दिली.



# मोटारसायकल काढायला गेलेल्या दोन तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू

## गेवराई तालुक्यातील उमापूर येथील दुर्दैवी घटना





गेवराई । प्रतिनिधी

विहिरीत पडलेली मोटारसायकल काढण्यासाठी, विहिरीत उतरलेल्या दोन तरूणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना उमापूर ता.गेवराई जि.बीड येथेशुक्रवार ता. २३ रोजी दु. तीन वाजण्याचे सुमारास घडली. दरम्यान, विहिरीत पाणी असल्याने दोन्ही तरूणांचा मृतदेह बाहेर काढण्यात अडचणी आल्या आहेत. विहिरीतील पाणी उपसण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, उमापूर पोलीसांचे पथक घटनास्थळी ठाण मांडून आहेत. बुडालेले दोघेजण राहता ता. शिर्डी जि. अहिल्यानगर नगर येथील असल्याची चर्चा आहे. गेवराई तालुक्यातील उमापूर जवळच्या मालेगाव रस्त्यावर हवाले यांच्या मालकीची विहिर आहे. या विहिरीत एक मोटारसायकल पडलेली आहे. सदरील मोटारसायकल काढण्याचे काम दोन तरूण करत होते. मात्र, विहिरीतल्या पाण्यात पेट्रोल पसरल्याने, तरूणांचा श्वास कोंडल्याने दोघेही पाण्यात बुडाल्याने, त्या दोघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. विशेष म्हणजे, विहिरीच्या अवतीभवती होते. तरीही, त्यांना काहीच करता आले नाही. विहिरीची खोली अधिक असल्याने, तिथपर्यंत मदत करता आली नाही. घटनेची माहीती मिळताच, चकलांबा, उमापूर येथील पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. पंपाचा वापर करून, विहिरीतील पाणी काढले जात आहे. मोटारसायकल विहिरीत कशी पडली, कुणी टाकली, त्याची नेमकी कारणे पोलीस तपासात उघड होतील, अशी माहिती आहे.

# सुलेमान देवळा ग्रामस्थांची कामे रखडली

## सतत गैरहजर असणाऱ्या ग्रामसेवकावर कारवाई करा
## बिडीओ ग्रामसेवकावर काय कारवाई करणार याकडे गावकऱ्यांचे लक्ष

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथे कार्यरत असलेले ग्रामसेवक शिंदे हे गेल्या कित्येक महिन्यापासून गैरहजर असून या गावाला लाभलेले ग्रामसेवक असून अडचण नसून खोळंबा अशा प्रकारे परिस्थिती झाली आहे हे कोणत्या राजकीय वरदहस्त मुळे या गावात येत नाहीत अशा ग्रामसेवकाची उचल बांगडी करण्यात दिरंगाईका होत आहे या ग्रामसेवकाला याविषयी जाब का विचारला जात नाही असं प्रश्नचिन्ह सध्या निर्माण झाला आहे घ्या गावचा कारभार ग्रामसेवक ला गेलाय त्या गावात ग्रामसेवक न येणे फार मोठे संकट आहे अनेक कामे ग्रामसेवकाकडूनच केली जातात सध्या पावसाळा सुरू आहे.

अनेक घरकुलाच्या कामासाठी त्यांच्या सह्या लागतात मग असे ग्रामसेवक असून काय फायदा अशा ग्रामसेवक वर एक कडक कारवाई केली पाहिजे नाहीतर अशा ग्रामसेवकाला बडतर्फ केले पाहिजे अशी मागणी आता जोडधरू लागली आहे शासनाचा पगार घेऊन असे ग्रामसेवक जर आपल्या सज्जावर हजर नसतील तर अशा ग्रामसेवकाला काय केले पाहिजे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे एकतर संबंधित अधिकाऱ्यांना अशा कामचुकार ग्रामसेवकाला बडतर्फ केलं पाहिजे परंतु अधिकाऱ्याकडूनही अशा ग्रामसेवकाला अभय मिळतं आणि हे ग्रामसेवक असेच आपल्या मस्तीत असतात यामुळे ग्रामस्थांची वेगवेगळ्या प्रकारची कामे रखडली आहे अशा या कामचुकार अधिकार्याची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी सुलेमान देवळा ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

अधिक माहिती अशी की ग्रामसेवक उद्धव शिंदे हे गेली दोन महिन्यांपासूनही जास्त दिवसांपासून सुलेमान देवळा ग्रामस्थांसाठी ते उपलब्ध नाहीत लोकांची कामे रखडली गेली आहेत. कामे घेऊन लोकांना थेट आष्टीला जावे लागत आहेत. सध्या घरकुलांची कामे चालू असून बरेच लोकांची पैसे अभावी कामे रखडली आहेत. अशा या भ्रष्ट अधिकारी ची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी सुलेमान देवळा येथील युवा कार्यकर्ते शिवम घोडके सागर देसाई नंदराज घोडके तुकाराम घोडके यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

# आष्टी तालुक्यात नियमांची पायमल्ली करत शेकडो वीटभट्ट्या सुरू

## २०१४ पासूनची आष्टी तहसील कडे वीट भट्ट्यांचे अद्यावत माहितीच नाही

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यामध्ये सुरू असलेल्या वीटभट्ट्या ह्या शासनाने घालून दिलेल्या नियमानुसार सुरू नाहीत. आष्टी तहसील कार्यालयातील गौण खनिज विभागा कडे आष्टी तालुक्यात सुरू असलेल्या वीट भट्ट्यांसंदर्भात माहिती विचारली असता या कार्यालयाकडून सन २०१४ सालची माहिती उपलब्ध करून दिली आहे. यावरून आष्टी तहसील कार्यालयाकडे गेल्या दहा वर्ष जुनी माहिती असल्याची गंभीर भाग समोर आले आहे. मग आष्टी तालुक्यात सर्व असलेल्या वीट भट्ट्या ह्या कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे हाच प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडत आहे.

आष्टी तहसील कार्यालयाच्या गौण खनिज विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार सन. २०१४ साली आष्टी तालुक्यात अंदाजे १२५ वीट भट्ट्या सुरू होत्या. सुरू असलेल्या वीट भट्टी चालकांकडून शासनाने घालून दिलेले नियम पाले नसल्याचेही कार्यालयाकडून सांगितले आहे. त्याचबरोबर कार्यालयाकडे २०१४ नंतरच्या सुरू झालेल्या नवीन वीट भट्ट्या किंवा बंद झालेल्या वीटभट्ट्या याचे कुठलेही नोंद नाही. या कार्यालयाकडे वीट भट्ट्या संदर्भात माहिती विचारले असता सन २०१४ सालची यादी त्यांनी दिले. यावरून असे स्पष्ट होते की, तालुक्यात सुरू असलेल्या वीट भट्ट्या अवैद्य आहे. अवैद्य सुरू असलेल्या वीट भट्ट्या यांना कोणाचा आशीर्वाद आहे. हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडत आहे.

**अवैद्य सुरू असलेल्या वीट भट्ट्यांवर कारवाई करा**

आष्टी तालुक्यीील अनेक वीट भट्ट्या या शासनाच्या नियमानुसार सुरू नाहीत. वीट भट्ट्या चालक हे शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करत नाहीत. नियमांचे पालन केल्यामुळे वीटभट्ट्यांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते त्यामुळे सामान्य नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. काही ठिकाणी तर नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. तालुक्यात ज्या ठिकाणी अवैधपणे वीट भट्ट्या सुरू आहेत त्या वीट भट्ट्यांवर संबंधित विभागाने कडक कारवाई करावी.

– कैलास दरेकर, मनसे शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष, बीड

# तात्काळ निधी वाटप करा..अन्यथा हनुमंत तोंडे यांचे आमरण उपोषण

## स्व.गोपिनाथरावजी मुंडे साहेब यांची पुण्यतिथी साजरी करुन आमरण उपोषणास सुरूवात

बीड । प्रतिनिधी



सतत सामाजिक सेवेमध्ये अग्रेसर असणारे प्रहारचे हनुमंत तोंडे यांनी आता दिव्यांग बांधवासाठी आमरण उपोषण करणार असल्याचे त्यांनी निवेदनाद्वारे सांगितले आहे. अधिक माहिती अशी कि, ३ जुन रोजी स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची पुण्यतिथी उपोषण स्थळी साजरी करुन आमरण उपोषणास सुरूवात होणार आहे. अनेक दिव्यांग बांधवानी अनेक दिवसापासुन दिव्यांग मत्रालयामध्ये फाईली दाखल केल्या आहेत. परंतू अनेक जनांना निधी अजुन काही मिळालेला नाही. म्हणुन २ जुन पर्यंत निधी वाटप करावा. नाही केला तर हनुमंत तोंडे स्वत: दिव्यांग महामंडळ बीड येथे आमरण उपोषण करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. या उपोषणाची सर्व जबाबदारी दिव्यांग महामंडळ बीड यांची असेल असेही हनुमंत तोंडे म्हणाले. अनेक जनांच्या निधी मागणी साठी तक्रारी आमच्याकडे आल्या असल्याचे त्यांनी प्रसिद्धि पत्रकाद्वारे सांगितले.

# आज संतोष बीडकर यांचे बासरी वादन

अंबाजोगाई । प्रतिनिधी



येथील संगीत साधना मंच च्या वतीने शास्त्रीय संगीत साधक व रसिकांसाठीच्या मासिक सभेत आज रविवार २५ मे रोजी होणाऱ्या सभेत लातुर येथील प्रख्यात गायक यांचे स्वतंत्र गायन होणार आहे. तबल्यावर संजय सुवर्णकार तर संवादिनी वर विश्वजीत धाट हे साथसंगत करतील खोलेश्वर महाविद्यालयाच्या स्व. गोपीनाथ मुंडे सभागृहात सांयकाळी साडे सहा वाजता होणाऱ्या या मासिक संगीत सभेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# ना पंकजाताई मुंडे यांचा शासकीय बंगल्यामध्ये प्रवेश व कार्यकर्ता संवाद मेळावा रंगतदार ठरला

बीड प्रतिनिधि

दिनांक २२ रोजी राज्याच्या पर्यावरण व हवामान बदल मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांचा रामटेक या शासकीय बंगल्यामध्ये गृहप्रवेश अगदी थाटात झाला पंकजाताईंचा लोकसभेमध्ये निसटता पराभव झाला होता परंतु आदरणीय ताईसाहेब खचून न जाता पुन्हा नव्या जोमाने कामाला लागल्या व राज्याच्या मंत्री होऊन राज्यातील जनतेचे कामे करण्याची जिम्मेदारी त्यांनी पुन्हा खांद्यावर घेतली व रामटेक या बंगल्याची निवड करून त्यांनी काल गृहप्रवेश केला यामध्ये राज्यभरातून शेकडो कार्यकर्ते यांचा संवाद मेळावा देखील आदरणीय ताई साहेबांनी घेतला असून तो कार्यकर्ता मेळावा अतिशय रंगतदार ठरला व पंकजाताईंनी कार्यकर्त्यांना एक नवी



ऊर्जा निर्माण करून दिली आहे असे मत यावेळी भारतीय जनता पार्टीचे युवा नेते गणेश लांडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे व्यक्त केले आहे ते पुढे म्हणाले की मी व माझ्यासारखे असंख्य कार्यकर्ते ताईंच्या छत्रछायेखाली काम करत असून त्या गोष्टीचा मला सार्थ अभिमान वाटतो आणि आपण एका समाजसेवी नेत्या सोबत काम करत आहोत याचा देखील गर्व वाटतो या कार्यक्रमासाठी राज्यभरातून आलेले शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोयाळ येथे सर्पदंशाने सख्या भावंडांचा दुर्दैवी मृत्यू

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील कोयाळ गावात एक हृदयद्रावक घटना घडली असून, सर्पदंशामुळे एका कुटुंबातील सख्या भावंडांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. ही घटना २४ मे रोजी मध्यरात्री १२ ते १ वाजताच्या सुमारास प्रदीप मधुकर मुंडे यांच्या राहत्या घरी घडली.



प्रदीप मुंडे यांची सात वर्षांची मुलगी कोमल आणि पाच वर्षांचा मुलगा शिवम हे रात्री झोपेत असताना त्यांच्या अंगावर साप आला व त्याने दोघांनाही दंश केला. दंशानंतर दोन्ही चिमुकल्यांची तब्येत अचानक बिघडली. तातडीने उपचारासाठी त्यांना रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच दोघांनीही प्राण सोडले. या घटनेमुळे संपूर्ण कोयाळ गावावर शोककळा पसरली असून, मुंडे कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. सर्पदंशामुळे एका घरातील दोन निष्पाप जीवांचा गेलेला बळीमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# लाडकी बहीण जिवन संपवणार नाही एवढं कठोर शासन करा : दत्ता कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील भुकूम ता. मुळशी येथील वैष्णवी शशांक हगवणे या विवाहित महिलेने सासरच्या लोकांकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली होती. लाडकी बहीण पुन्हा आत्महत्या करून आपल जिवन संपवणार नाही याच्यासाठी मुख्यमंत्री यांनी हस्तक्षेप करावा अश्या अशायाच निवेदन भारतीय काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने तहसीलदार द्वारे मुख्यमंत्री यांना दिले. सदरील प्रकरणात वैष्णवीच्या सासरकडील हगवणे कुटुंबाने विवाहावेळी ५१ तोळे सोने, फॉर्च्यूनर कार आणि इतर महागड्या गोष्टी हुंडा



म्हणून घेतल्या असूनही, तिच्यावर लग्नानंतरही सातत्याने छळ होत राहिला. विशेष म्हणजे या कुटुंबाचे काही सदस्य राजकीय पक्षाशी संबंधित असून त्यांच्या सामाजिक व राजकीय दबावामुळे चौकशीत अडथळे येण्याची शक्यता आहे. तसेच दोषींवर कठोर व वेगवान कायदेशीर कारवाई होणे गरजेचे आहे, फरार आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर आरोपपत्र दाखल करावे, प्रकरणाची सखोल, स्वतंत्र व पारदर्शक चौकशी व्हावी, पीडितेच्या कुटुंबीयांना शासनामार्फत न्याय व इतर मदत मिळावी,अशा मागण्या आम्ही काँग्रेस अनु जाती विभागाच्या वतीने करत आहोत.तसेच जर शासनाकडून या प्रकरणात तातडीने पावले उचलली गेली नाहीत, तर काँग्रेस अनु. जाती विभागाकडून आंदोलनात्मक मार्ग अवलंबण्यात येईल. या घटनेमुळे राज्यातील लाडक्या बहिणीमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, लाडकी बहीण आत्ता पुन्हा आपल जिवन संपवणार नाही एवढं कठोरातील कठोर शासन करावे अशी मागणी काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्यासह काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनद्वारे केली आहे. यावेळी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष नारायण होके, काँग्रेस अनु जाती विभागाचे तालुकाध्यक्ष बळीराम कारके सह अप्पासाहेब भारस्कर, नागेश कांबळे, नासिर शेख, अशोक कांबळे, अंशीराम कांबळे, भानुदास कांबळे, धुराजी कांबळे, किसन लोखंडे, रवी कांबळे, संतोष कांबळे, शिवाजी कांबळे सह काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT